# बी.ए - सेम – २ (पाश्चिमात्य राजकीय विचारवंत)

## प्रकरण दुसरे – ॲरिस्टॉटल

ॲरिस्टॉटल चा जीवनपरिचय – ॲरिस्टॉटल हा प्लेटोचा शिष्य आहे. त्याचा जन्म ग्रीस देशातील स्टॅगीरा ह्या गावी झाला. त्याने वीस वर्ष प्लेटोच्या शिक्षण संस्थेत शिक्षण घेतले. त्याने इसपू ३३५ मध्ये अथेन्स मध्ये ;लीसियम' नावाची शिक्षण संस्था स्थापन केली. त्याने एकूण ४०० ग्रंथ लिहिले. राज्यशास्त्र विषयांवर 'The Politics' and 'The Continuation' असे दोन ग्रंथ लिहिले आहे. त्याने अध्यात्मंक राजकीय विचारांना वेगळे करून स्वतंत्र राजकीय विचाराची मांडणी केली आहे म्हणूनच त्याला राज्यशास्त्राचा जनक म्हटले जाते.

ॲरिस्टॉटलचे राज्याविषयक विचार – १.राज्य ही एक नैसर्गिक व स्वाभाविक संस्था आहे. २.राज्य ही सर्वश्रेष्ठ व विकसनशील संस्था आहे. ३. राज्य राज्य ही सेंद्रिय वस्तू आहे. ४.राज्याचे विविध प्रकार (राजतंत्र, शिष्टतंत्र, लोकतंत्र) ५.शिक्षण देणे हे राज्याचे कार्य आहे.

ॲरिस्टॉटलच्या आदर्श राज्याची वैशिष्टे – १.संविधान २.शासनप्रकार ३.राज्याची सहा अंगे ४.भूप्रदेश ५.लोकसंख्या ६.नागरिकांचे स्वातंत्र्य ७.शिक्षण ८.संपत्ती ९.सार्वभौमसत्ता १०.कायदा

ॲरिस्टॉटलच्या मते क्रांतीचे प्रकार – १.संपूर्ण क्रांती २.आंशिक क्रांती ३.वर्ग क्रांती ४.व्यक्तिगत क्रांती ५.गैरव्यक्तीक्रांती ६.वाड्मयीन क्रांती ७. रक्तरंजित क्रांती ८.रक्तहीन क्रांती

ॲरिस्टॉटलचे दास्यत्वा (गुलामगिरी) संबधी विचार – ॲरिस्टॉटलने गुलामगिरीचे समर्थन करतो. प्राचीन ग्रीकमध्ये गुलामगिरी व्यवस्था फार पूर्वीपासून अस्तित्वात होती. या बद्दल तो म्हणतो, गुलामगिरी प्रथा नष्ट केली तर ग्रीसची राजकीय आणि सामाजिक व्यवस्था धोक्यात येईल. ॲरिस्टॉटल व्यवहारवादी शास्त्रज्ञ होता. त्यावेळी गुलामांचा उपयोग शेतीसाठी साधन म्हणून होत असे. गुलाम ही सधन लोकांची आणि राष्ट्राची संपत्ती मानली जात असे. गुलामांच्या परिश्रमावर व्यक्तीचा आणि समाजाचा चरितार्थ चालत होता. गुलामाचे प्रकार – नैसर्गिक गुलाम – ज्या व्यक्ती जन्मत:च मंदबुद्धीच्या आणि बुद्धीहीन असतात तसेच ज्या व्यक्ती अकुशल आणि जीवन जगण्यास अयोग्य असतात त्यांना ॲरिस्टॉटल नैसर्गिक गुलाम म्हणतो. वैधानिक गुलाम – पूर्वी ग्रीक नगरराज्यात आणि इतरही राज्यांमध्ये सतत युद्धे होत असत. अशा युद्धात विजयी ठरलेले राज्य पराभूत राष्ट्राच्या सैनिकांना आणि नागरिकांना ओलीस ठेवीत असे. त्यांना तो वैधानिक गुलाम असे म्हणतो.

ॲरिस्टॉटलने राज्याचे केलेले वर्णन – राज्याचे वर्गीकरण करतांना ॲरिस्टॉटलने मुख्यत: दोन आधार मान्य केले आहे. १.प्रमाणात्मक किंवा संख्यात्मक ह्याचा अर्थ राज्याची सत्ता किती लोकांच्या हाती

आहे? २.गुणात्मक ह्याचा अर्थ शासनाचा उद्देश कोणता? सार्वजनिक साध्य करणे किंवा राज्यकर्त्याचा स्वार्थ पाहणे. ह्या आधारावर ॲरिस्टॉटलचे राज्याचे तीन शुद्ध आणि तीन भ्रष्ट प्रकार पाडले आहे.

| राज्यकर्त्याची संख्या | शुद्ध प्रकार | भ्रष्ट प्रकार |
|---|---|---|
| एका व्यक्तीची सत्ता | राजेशाही (राजतंत्र) | हुकुमशाही |
| काही व्यक्तीची सत्ता | कुलीनतंत्र (महाजनसत्ता) | धनिक तंत्र |
| अनेक व्यक्ती बहुसंख्य | जनतंत्र (प्रजातंत्र) | लोकशाही |

## प्रकरण तिसरे – जॉन स्टुअर्ट मिल

जॉन स्टुअर्ट मिलचा परिचय - जॉन स्टुअर्ट मिलचा जन्म २० मे १८०६ रोजी लंडन येथे झाला. हा बेंथमचे शिष्य होते. त्याचे शिक्षण फ्रांस येथे झाले. काही काळ त्याने इस्ट इंडिया कंपनीत नौकरी केली. एका वृत्तपत्राचा संपादक म्हणून सुद्धा काम केले. १८६६ साली वेस्ट मिनिस्टर मतदान संघातून तो ब्रिटीश संसदेमध्ये सदस्य म्हणून निवडून आला.

जॉन स्टुअर्ट मिलची ग्रंथ संपदा – सिस्टीम ऑफ लॉजिक, पोलिटिकल एकोनामी, ऑन लिबर्टी (हा ग्रंथ त्याने आपल्या हरियट टेलर नावाच्या पत्नीला मृत्यूपश्चात १८३० ला अर्पण केला), थॉटस ऑन पार्लमेंटरी रीफोर्म्स, रिप्रेझेंटेटिव्ह गव्हर्नमेंट, सब्जेकशन ऑफ वुमेन, युटेलिटेरियानिझम ऑफ रिलीजन या सारखे ग्रंथ लिहिले. त्याचप्रमाणे १८७३ साली स्वत:चे आत्मचरित्र (ऑटोबायोग्राफी) हा ग्रंथ लिहिला.

जॉन स्टुअर्ट मिलचे स्वातंत्र्यासंबधी विचार – स्वातंत्र्यासंबधीचे विचार मिलने आपल्या ‘ऑन लिबर्टी’ ह्या ग्रंथात मांडले आहे. त्यावेळी इंग्लंडमध्ये सुधारणा आंदोलने फार मोठया प्रमाणांत झाली होती. त्यामुळे लोककल्याणकारी राज्याचा हस्तक्षेप बराच वाढू लागला. संसदेने लोककल्याणाच्या नावाखाली अनेक कायदे तयार केले. त्यामुळे सामाजिक व्यवस्थेमध्ये शासनाचा हस्तक्षेप सतत वाढल्यास व्यक्तीस्वातंत्र्य नष्ट होऊन स्वेछाचारी शासन निर्माण होईल अशी भीती मिलला वाटत होती. ब्रिटीश संसदेने जनतेवर लादलेले अनेक कायदे मिलला मान्य नव्हते. कारण त्या कायद्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्यांचा ऱ्हास झाला होता त्यामुळे मिलने स्वातंत्र्यासबंधी विचार मांडले. मिलने स्वातंत्र्याचे दोन प्रकार सांगितले आहे. १. विचार स्वातंत्र्य २.कार्यस्वातंत्र्य

मिलचे प्रातिनिधीक सरकारविषयीचे विचार – मिलने प्रातिनिधिक सरकारसंबधी विचार आपल्या ‘रिप्रेझेंटेटिव्ह गव्हर्न्मेंट’ या ग्रंथात मांडले आहे. मिलच्या मते, नागरिकांच्या सदगुणाचा आणि शहाणपणाचा विकास करणारे शासन सर्वोत्तम शासन होय. सार्वजनिक व्यवहारात लोकांचा सहभाग

असल्यासच त्याच्या गुणवत्तेचा बोध घेता येतो. प्रातिनिधिक शासन हे इतर कोणत्याही शासनापेक्षा श्रेष्ठतम शासन आहे कारण त्या शासनात प्रत्येकाला राजकीय व्यवहारात सहभागी होण्याची समान संधी असते.

प्रातिनिधिक सरकारमध्ये असलेले गुण – १. शासनाचे स्वरूप प्रतिनिधीच्याद्वारे निर्धारित होते. २.शासनव्यवस्थेत सहभागी होण्याची समान संधी असते. ३.जनतेद्वारे वेळोवेळी योग्य प्रतिनिधीची निवड होते. ४.प्रतिनिधी जनतेला जबाबदार राहतात. सार्वभौमसत्ता जनतेकडे असते. ५.संविधांनानुसार शासनकारभार चालतो त्यामुळे लोकोपयोगी शासन निर्माण होते.

## सरावासाठी प्रश्न

### वस्तुनिष्ठ प्रश्न – रिकाम्या जागा पूर्ण करून वाक्य पूर्ण लिहा.

१.प्लेटोचा गुरु ....................... हा होता. (साक्रेटीस, अरिस्टोटल, मार्क्स, मिल)

२.प्लेटोचा न्याय सिद्धांत ................. या ग्रंथात मांडला आहे. (दि रिपब्लिक, दि लॉज, दि कान्टूटीशन, ऑन लिबर्टी)

३.राज्यशास्त्राचा जनक ........................ला म्हटले जाते. (प्लेटो, अरिस्टोटल, मार्क्स, मिल)

४.राज्य ही ....................... संस्था आहे असे अरिस्टोटल म्हणतो. (नैसर्गिक, मानवी, राजकीय, कार्यकारी)

५. ............... हे मिल चे गुरु होते. (बेन्थम, प्लेटो, अरिस्टोटल, मार्क्स)

६. स्वतंत्र्या संबधी विचार मिल ने .................... या ग्रंथात मांडले. (ऑन लिबर्टी, सिस्टम ऑफ लॉजिक, पोलिटिकल इकोनॉमी)

### दीर्घोत्तरी प्रश्न

१.प्लेटोचा न्याय सिद्धांत स्पष्ट करून न्याय सिद्धांताची वैशिष्टे सांगा.

२.अरीस्टोटलचे राज्यासंबधी विचाराचे विस्तृत विवेचन करा.

३.अरीस्टोटलच्या क्रांतीविषयक विचारांचे थोडक्यात विवेचन करा.

४.मिलचे प्रातिनिधिक सरकार संबधी विचार सांगा.

५.मिलच्या स्वातंत्र्यासंबधी विचारांचे स्पष्टीकरण करा.

## लघुतरी प्रश्न

१.प्लेटोवर पडलेला प्रभाव
२.प्लेटोच्या समाजाची वर्गव्यवस्था
३.अरीस्टोटल नुसार राज्याचे प्रकार
४. अरीस्टोटल नुसार आदर्श राज्य
५. मिलचे स्वातंत्र्याचे प्रकार
६. मिल नुसार प्रतिनिधीची कार्य

---

## संदर्भ -

राजकीय सिद्धांत व पाश्चिमात्य राजकीय विचारवंत – प्रा.डॉ.सुशांत चिमणकर, प्रा.डॉ,विमल राठोड – अंशुल पब्लिकेशन नागपूर – प्रथम आवृत्ती २०१७ – ISBN NO.987-81-931789-6-6